# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०                                  दि.२६ ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.२६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सद्या सुरू असलेल्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र (बॅकलॉगसह) परीक्षेपासून विविध कारणाने वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी १८ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत एमसीक्यु पॅटर्ननुसार ऑनलाईन परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे दरम्यान सद्या सुरु असलेल्या परीक्षेच्या अकाराव्या दिवशी दुपारी १.३० वाजेपर्यंत ९२टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होत्या.

उन्हाळी २०२० मधील अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या बॅकलॉगसह परीक्षा १२ ऑक्टोबर पासून सूरू झाल्या आहेत. या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेतल्या जात आहेत. जे विद्यार्थी परीक्षा अर्ज सादर करूनही अपरिहार्य कारणामुळे परीक्षेपासून वंचित राहिले आहेत अशा सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी १८ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीत एमसीक्यु पॅटर्ननुसार फक्त ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येणार आहेत. याबाबत सविस्तर माहिती यथावकाश कळविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयातील ऑनलाईन परीक्षा समन्वयकांशी संपर्क साधावा अशी माहिती परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

दरम्यान सोमवारी परीक्षेचा अकरावा दिवस होता. दुपारपर्यंत विविध विद्याशाखांच्या ९२ विषयांच्या परीक्षा होत्या. सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत झालेल्या परीक्षांच्या विविध सत्रात ३ हजार ६४२ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे दिली तर या सत्रात ७५० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होती.

---

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/पदवीप्रदान-ईमेलबातमी/२०२०                                दि. २६ ऑक्टोबर, २०२०

**जळगाव दि.२६ (प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २९ व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी विलंबशुल्कासह ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि.३० नोव्हेंबर पर्यंत वाढविण्यात आली आहे.**

विद्यापीठातर्फे ऑक्टोबर,२०१९ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत व अद्यापपावेतो ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज सादर केलेले नसतील त्यांनी दि.३० ऑक्टोबर पर्यंत अर्ज सादर करावेत. असे आवाहन संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले होते, तथापि आता ३० नोव्हेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner- Examination- Convocation वर दि.३० नोव्हेंबर पर्यंत विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरता येतील. उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षाचे आत पदवीप्रमाणपत्रासाठी रूपये ३५०/- तर उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षापेक्षा जास्तीचा कालावधीसाठी रूपये १०००/- शुल्क भरावयाचे आहेत.

माहे एप्रिल-मे, २०२० च्या होणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्ज भरण्यासाठी परीक्षेच्या निकालानंतर स्वतंत्र तारखा जाहीर करण्यात येतील अशी माहिती संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी दिली आहे.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/पदवीप्रदान-ईमेलबातमी/२०२०                                दि. २० ऑक्टोबर, २०२०

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या दैनिकात जळगाव, धुळे व नंदूरबार आवृत्तीत प्रसिद्ध करावी,ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी